
## पुणे

### एमपीएससी अर्जप्रणाली : स्पर्धा परीक्षा उमेदवारांना दिलासा

# प्रोफाईल अद्ययावतीकरणास मुभा

प्रभात वृत्तसेवा




**पुणे, दि.२९ -** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ऑनलाइन अर्जप्रणालीद्वारे उमेदवारांनी तयार केलेल्या प्रोफाईलमध्ये माहिती अद्ययावत तथा बदलण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे आयोगाच्या परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या स्पर्धा परीक्षा उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.

आयोगामार्फत नुकतेच ३५० पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. त्यासाठी मोठ्या संख्येने उमेदवार अर्ज करीत आहेत. अर्ज करण्यासाठी उमेदवारांना एमपीएससीच्या महाऑनलाइन संकेतस्थळावर स्वत:ची प्रोफाईल तयार करणे आवश्यक आहे. या प्रोफाईलमध्ये उमेदवारांना त्यांची वर्गवारी, शैक्षणिक अर्हता व अनुभव या व्यतिरिक्त अन्य माहिती बदलता येत नव्हती. त्यामुळे उमेदवारांपुढे मोठी अडचण निर्माण होत होती.

दरम्यान, काही उमेदवारांचे मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडीसह आदी माहिती बदलण्यास मुभा नव्हती. ही माहिती अद्ययावत करावयाचे असल्यास प्रत्यक्ष उमेदवारांना ई-मेल अथवा निवेदनाद्वारे आयोगाकडे पत्रव्यवहार करावे लागत होती. नुकतेच राज्य सेवा परीक्षेसाठी अर्ज मोठ्या संख्येने येत आहेत. त्याचबरोबर प्रोफाईलमधील माहिती बदलण्यासाठीही निवेदन येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना त्यांचे ई-मेल आयडी, मोबाइल नंबर, उंची, वजनचे दावे त्यांच्या स्तरावर राज्य सेवा पूर्व परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत ऑनलाइन प्रणालीद्वारे बदलण्यास मुभा देण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.त्यानुसार उमेदवारांनी आपले प्रोफाईल अद्ययावत करावेत. असे बदल करताना कोणत्याही परिस्थितीत उमेदवार खोटी व दिशाभूल करणारी माहितीचा अंतर्भाव करणार नाहीत, त्याची खबरदारी करावी. एका उमेदवाराचे एकापेक्षा जास्त प्रोफाईल तयार होणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे आवाहन आयोगाने केले आहे.

निवडक